**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 08/04/2026

**आलोसे** - प्रशांत रमेश देवगया, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा केळगाव, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, यांनी तक्रारदार यांचेकडुन 5,000/- रूपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | प्रशांत रमेश देवगया, वय 34 वर्षे, पद-ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा केळगाव, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर,रा.ठी. विठ्ठल कला सोसायटी, आनंद पार्क जवळ, भराडी रोड, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 7,000/- (सात हजार रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | 5,000/- (पाच हजार रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.शांतीलाल चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांनी त्यांची पत्नीचे नावे खरेदी केलेल्या जमीनीचा फेर मंजुर करुन 7/12 वर नोंद करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आलोसेने पंचासमक्ष तक्ररदारांकडे त्यांचा फेरफार मंजुरी करून सातबारावर नाव आणण्यासाठी 7000 रुपयाची मागणी करून, तडजोडीअंती 5000 रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 08/04/2026 रोजी पंचासमक्ष सापळा कारवाई आजमावली असता बोरगाव बाजार या गावात आलोसे प्रशांत देवगया यांनी तक्रारदार यांच्या कडुन पंचा समक्ष 5000 रुपये लाचेची रक्कम स्वतः स्वीकारल्याने आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सिल्लोड ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री केशव दिंडे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ अशोक नागरगोजे, पोअंम/आत्माराम पैठणकर, पो.अंम.रामेश्वर ताठे, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.